पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
मा.स्थायी समिती
कार्यपत्रिका क्रमांक - १६७
सभावृत्तांत

दिनांक- ४.०५.२०१० वेळ - दुपारी ४.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार दिनांक ४.०५.२०१० रोजी दुपारी ४.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.प्रशांत कृष्णराव शितोळे
२. मा.जगदीश शंकर शेट्टी
३. मा.सौ.आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी
४. मा.जितेंद्र बाबासाहेब ननावरे
५. मा.रामदास तानाजी कुंभार
६. मा.सुरदास तुकाराम गायकवाड
७. मा.सुमनताई मधुकर पवळे
८. मा.साळुंके राजेंद्र गुलाबराव
९. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
१०. मा.थोरात एकनाथ दादा
११. मा.तानाजी विठ्ठल खाडे
१२. मा.गावडे जयश्री वसंत
१३. मा.सौ.वर्षा विलास मडीगेरी

याशिवाय मा.आशिष शर्मा-आयुक्त, मा.डुंबरे-अति.आयुक्त, मा.देशमुख, मा.सावंत, मा.गायकवाड, मा.गावडे, मा.झुरे - सहा.आयुक्त,मा.धाडगे - मुख्यलेखापरिक्षक, मा.काळे-नगरसचिव, मा.चव्हाण-अति.शहर अभियंता, मा.सावळे-अति.अधिक्षक अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.डॉ.कुणचगी-आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.डॉ.अय्यर - वैद्यकिय संचालक, मा.पाटील-उपसंचालक (नगररचना), मा.लोंढे-मुख्य लेखापाल, मा.कांबळे, मा.जाधव, मा.कपिले, मा.कुदळे, मा.थोरात, मा.ढगे, मा.बनकर, मा.चव्हाण, मा.निकम मा.दुधेकर, मा.चिंचवडे, मा.पाटील - कार्य. अभियंता,मा.साळुंके-मुख्यउद्यान अधिक्षक,मा.पोमण - संगणक अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------------------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करून घेणेत आले-

विषय क्रमांक- २५) निविदा नोटीस क्र.६/१-२००९-१० मधील कामांचे करारनामे करणेस मंजुरी मिळणेबाबत...

विषय क्रमांक- २६) झोपडपट्टीतील नळ कनेक्शन ग्राहकांचे पाणीपट्टी दरांबाबत...

विषय क्रमांक- २७) फिरती भत्त्याबाबत-मा.प्रभाकर वाघेरे, मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक- २८) साफसफाईबाबत-मा.प्रभाकर वाघेरे, मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक- २९) टि.व्ही.खरेदीबाबत-मा.प्रभाकर वाघेरे, मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक- ३०) हॉल बांधणेबाबत-मा.प्रभाकर वाघेरे, मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक- ३१) अनुदान देणेबाबत-मा.प्रभाकर वाघेरे, मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक- ३२) विद्युतविषयक व अनुषंगिक कामे करणे बाबत-मा.प्रभाकर वाघेरे, मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक- ३३) भोसरी येथील जलतरण तलावाबाबत-मा.प्रभाकर वाघेरे, मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक- ३४) नि.क्र.६/३-०९/१० मधील निविदा अट क्र.६० (भाग-२) रद्द करणे बाबत-मा.रामदास कुंभार, मा.तानाजी खाडे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक- ३५) सेक्टर २३ जलशुध्दीकरण केंद्र येथे दूरध्वनी सुविधा पुरविणेबाबत-मा.प्रभाकर वाघेरे, मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक- ३६) सन २०१०-२०११ चे अंदाजपत्रकीय तरतूद वर्गीकरण (वाढ / घट) बाबत-मा.जितेंद्र ननावरे, मा.सुरदास गायकवाड यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक- ३७) मनपाचे सन २०१०-२०११ चे अंदाजपत्रकीय तरतूद वर्गीकरणा बाबत-मा.प्रभाकर वाघेरे, मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक- ३८) स्थापत्य अ मुख्यालयांतर्गत कामांसाठी नवीन तरतूदी करणे व तरतुदीमध्ये दुरुस्ती करणेबाबत-मा.प्रभाकर वाघेरे, मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक- ३९) तरतुद वर्ग करणेबाबत-मा.प्रभाकर वाघेरे, मा.राजेंद्र साळुंके यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक- ४०) उद्यान देखभाल संरक्षणाबाबत-मा.प्रभाकर वाघेरे, मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक- ४१) सन २०१०-११ चे अंदाजपत्रकातील तरतूद वर्ग करणेबाबत-मा.जितेंद्र ननावरे, मा.रामदास कुंभार यांचा प्रस्ताव...

---------------------

मा.प्रभाकर वाघेरे- मा.स्थायी समिती सभा दिनांक २२.४.२०१० ठराव क्र.१०९७८ मध्ये "व्यायामशाळांकरीता व्यायामसाहित्य" या मजकूरानंतर "(पुढील दोन वर्षे कालावधीकरीता)" हा मजकूर नमुद करणेची दुरुस्ती करणेत यावी.

मा.स्थायी समिती सभा दिनांक २२.४.२०१० ठराव क्र.१०९७८ मध्ये "व्यायामशाळांकरीता व्यायामसाहित्य" या मजकूरानंतर "(पुढील दोन वर्षे कालावधीकरीता)" हा मजकूर नमुद करणेची दुरुस्ती करणेत आल्याचे व त्या दुरुस्तीसह दिनांक २०.४.२०१० व २२.४.२०१० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १६५) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ठराव क्रमांक- ११०५३ विषय क्रमांक- १
दिनांक- ४.०५.२०१० विभाग- वैद्यकीय
सुचक- मा.सुरदास गायकवाड अनुमोदक- मा.सुमनताई पवळे
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वैद्य/७/कावि/९४१/१० दि.२२/४/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मनपाच्या सर्व रूग्णालये व दवाखान्यांमध्ये पीएमपीएमएल कर्मचारी (पुर्व पी.सी.एम.टी.) व त्यांचे कुटूबियांना मोफत वैद्यकीय सुविधा पुढील निर्णय होईपर्यंत देणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक- ११०५४ विषय क्रमांक- २
दिनांक- ४.०५.२०१० विभाग- विद्युत
सुचक- मा.सुमनताई पवळे अनुमोदक- मा.सुरदास गायकवाड
संदर्भ-मा.सह शहर अभियंता (वि/यां) यांचे जा.क्र.विद्युत/नि/१/कावि/६४/१० दि.२१/४/१०

मा.सह शहर अभियंता (वि/यां) यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.१४/०९/१० मधील अ.क्र.३ अन्वये, फुगेवाडी जकात नाका येथे १५ मीटर ॲन्टेना मास्ट बसविणेकामी मे.प्रथमेश एंटरप्रायजेस (नि.र.रू. ५,५५,०००/- [र.रू.पाच लाख पंचावन्न हजार] पेक्षा १ % कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक- ११०५५ विषय क्रमांक- ३
दिनांक- ४.०५.२०१० विभाग- ब प्रभाग
सुचक- मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक- मा.जगदीश शेट्टी
संदर्भ-मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.एएमसी/बप्र/कावि/८/५०/१० दि.२६/४/१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या ब प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/०९-१० मधील अ.क्र.३३ अन्वये, चिंचवड तालेरानगर मधील मुरलीधर माचुत्रे व्यायामशाळेवर पहिला मजला करणेकामी मे.परमानंद कृपलानी (नि.र.रू.९,३१,०००/- [र.रू.नऊ लाख एकतीस हजार] पेक्षा १४.९९ % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक- ११०५६ विषय क्रमांक- ४
दिनांक- ४.०५.२०१० विभाग- ब प्रभाग
सुचक- मा.जगदीश शेट्टी अनुमोदक- मा.आशा सुर्यवंशी
संदर्भ-मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.एएमसी/बप्र/कावि/८/४९/१० दि.२६/४/१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या ब प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२००९-१० मधील अ.क्र.५९ अन्वये, वॉर्ड क्र.५७ मध्ये किवळे येथे स्मशान भूमी वेटींग शेड बांधणेकामी मे.परमानंद ए.कृपलानी (नि.र.रू.७,००,२८०/- [र.रू.सात लाख दोनशे ऐंशी] पेक्षा १३.९९ % कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक- ११०५७ विषय क्रमांक- ५

दिनांक- ४.०५.२०१० विभाग- स्थापत्य
सुचक- मा.जयश्री गावडे अनुमोदक- मा.वर्षा मडीगेरी
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/२ब/कावि/१३१/१० दि.२६/४/१०

विषय- नि.नो.क्र.२९/१३९-२००७-०८ मधील कामांचे करारनामे करणेस मंजूरी मिळणेबाबत-

विषय क्रमांक ५ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक- ११०५८ विषय क्रमांक- ६
दिनांक- ४.०५.२०१० विभाग- ब प्रभाग
सुचक- मा.जयश्री गावडे अनुमोदक- मा.सुमनताई पवळे
संदर्भ-मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.वि/बप्र/जा/२८९/१० दि.२६/४/१०

मा.प्रभाग अधिकारी यांची शिफारस विचारात घेवून-

हुतात्मा चाफेकर शाळा क्र.२ येथील विद्युत विषयक कामाचे वॉर्ड स्तरीय योजनेतून नुतनीकरण करणे कामी दरपत्रके प्राप्त झालेली असून सदरचे काम हे तातडीने असल्याने विमलाई इले.कॉर्पो. यांचेकडून अंदाजपत्रक र.रू. ४९,९८९/- [र.रू.एकोणपन्नास हजार नऊशे एकोणनव्वद] पेक्षा १.२ % कमी दराने करारनामा व काम करून घेणेस तसेच सदर शाळेच्या सर्व वर्गात सदरचे दराने ध्वनीक्षेपण व फॅनची व्यवस्था करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक- ११०५९ विषय क्रमांक- ७
दिनांक- ४.०५.२०१० विभाग- ब प्रभाग
सुचक- मा.एकनाथ थोरात अनुमोदक- मा.तानाजी खाडे
संदर्भ-मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.वि/बप्र/जा/२९०/१० दि.२६/४/१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

रावेत विभागातील वॉर्ड क्र.५७ मधील जुनो फिटींगची दुरुस्ती वॉर्ड स्तरीय योजने मधुन करणे कामी दरपत्रके प्राप्त झालेली असून सदरचे काम हे तातडीने असल्याने विमलाई इले.कॉर्पो. यांचेकडून अंदाजपत्रक र.रू. ४९,९८५/- [र.रू. एकोणपन्नास हजार नऊशे पंच्याऐंशी] पेक्षा १.२ % कमी दराने करारनामा व काम करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक- ११०६० विषय क्रमांक- ८
दिनांक- ४.०५.२०१० विभाग- मध्यवर्ती भांडार
सुचक- मा.तानाजी खाडे अनुमोदक- मा.एकनाथ थोरात
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मभां/१०/कावि/१६४/१० दि.२६/४/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

सन २०१०-११ चे जनगणना कामासाठी दि.३०/४/२०१० पर्यंत पुरवठा करणे आवश्यक असल्याने पी-कॅपचे लघुत्तम दरपत्रकधारक मे.युनिक एंटरप्रायजेस, रविवार पेठ यांचेकडून प्रस्तावात नमुद प्रमाणे पी-कॅप साहित्य तातडीची गरज विचारात घेऊन खरेदीकामी पुरवठा आदेश निर्गत केला असुन या पुरवठ्याकरीता खर्च र.रू.१,१६,२७२/- [र.रू. एक लाख सोळा हजार दोनशे बहात्तर] येत असल्याने सदरची रक्कम करारनामा न करता अदायगीस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक- ११०६१ विषय क्रमांक- ९
दिनांक- ४.०५.२०१० विभाग- क प्रभाग
सुचक- मा.राजेंद्र साळुंके अनुमोदक- मा.प्रभाकर वाघेरे
संदर्भ-मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.कप्र/लेखा/निक/१५/कावि/९४/१० दि.२६/४/१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या क प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.५/२००९-१० मधील अ.क्र.४ अन्वये, प्रभाग क्र.१४ सदगुरूनगर येथे स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.श्री.आर.एम.इंटरप्रायजेस (नि.र.रू.९,२०,०००/- [र.रू.नऊ लाख वीस हजार] पेक्षा ४१.९९% कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक- ११०६२ विषय क्रमांक- १०
दिनांक- ४.०५.२०१० विभाग- क प्रभाग
सुचक- मा.प्रभाकर वाघेरे अनुमोदक- मा.राजेंद्र साळुंके
संदर्भ-मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.कप्र/लेखा/निक/१५/कावि/९७/१० दि.२६/४/१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या क प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.४/२००९-१० अन्वये, भोसरी वॉर्ड क्र.१९ मधील आरक्षण ४१५ (मुलांचे खेळाचे मैदान) ला सिमाभिंत बांधणेकामी प्रियांका इंटरप्रायजेस (नि.र.रू.९,०१,८०५/- [र.रू.नऊ लाख एक हजार आठशे पाच] पेक्षा २७.५८% कमी) या सर्वात कमी दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक- ११०६३ विषय क्रमांक- ११
दिनांक- ४.०५.२०१० विभाग- स्थापत्य
सुचक- मा.सुरदास गायकवाड अनुमोदक- मा.सुमनताई पवळे
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/१अ/कावि/७/१० दि.२७/४/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१७/२००९-१० मधील अ.क्र.३ अन्वये, प्रभाग क्र.५, ६, ७, ८ मध्ये नव्याने विकसित होणाऱ्या भागाचे रस्ते हॉटमिक्स

पध्दतीने डांबरीकरण करणे कामी मे.मोहनलाल मथरानी कन्स्ट्रक्शन प्रा.लि. (नि.र.रू. २३,९०,१३५/- [र.रू.तेहवीस लाख नव्वद हजार एकशे पस्तीस] पेक्षा २१.६९ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजुर दराने र.रू.१८,७१,७१५/- [र.रू.अठरा लाख एक्काहत्तर हजार सातशे पंधरा] पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा रक्कमेच्या १० % पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक- ११०६४ विषय क्रमांक- १२
दिनांक- ४.०५.२०१० विभाग- उद्यान
सुचक- मा.सुमनताई पवळे अनुमोदक- मा.सुरदास गायकवाड
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.उद्यान/नि/१/७२/१० दि.२७/४/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या उदयान विभागाकडील नि.नो.क्र.८/२००९-१० अन्वये, सावरकर उद्यान (प्रेमलोक पार्क), चिंचवड येथील झुकझुक गाडी भाडेतत्वावर चालविणेकामी मे.कोमल एंटरप्रायजेस (प्रति वर्ष भाडे र.रू.१७,०००/- [र.रू.सतरा हजार]) या सर्वात जास्त दराचे ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

(नि.र.रू.२,५०,०००/- [र.रू.दोन लाख पन्नास हजार])

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक- ११०६५ विषय क्रमांक- १३
दिनांक- ४.०५.२०१० विभाग- दूरसंचार
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक- मा.सुरदास गायकवाड
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.दूरसंचार/१/कावि/५६/१० दि.२६/४/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

संत तुकाराम अग्निशमन केंद्र येथील अग्निशमन अधिकारी कार्यालयाकरिता अनखीण एक दूरध्वनी लाईन देवुन त्यावर सध्याच्या दूरध्वनीवरील इंटरनेट सेवा बंद करून इंटरनेट कनेक्शन देणेस व त्यासाठी येणारा सुरवातीचा खर्च र.रू.३,९५२/- (अनामत र.रू.१,०००/- + मासिक दूरध्वनी भाडे सर्व करासह र.रू.१९९/- + इंटरनेट मासिक भाडे सर्व करासह र.रू.७७३/- + इंटरनेट मॉडेम वन टाईम सर्व करासह र.रू.१,९८०/-) तसेच दूरध्वनी वापरावर नियंत्रण राहणेसाठी सदर दूरध्वनीस र.रू. १,५००/- मासिक अधिकतम वापर मर्यादा निश्चित करून त्यावर झालेल्या बिलाची रक्कम अग्निशमन अधिकारी यांचे पगारातून वसूलात आणणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक- ११०६६ विषय क्रमांक- १४
दिनांक- ४.०५.२०१० विभाग- मध्यवर्ती भांडार
सुचक- मा.सुरदास गायकवाड अनुमोदक- मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मभां/९/कावि/२६८/१० दि.२४/४/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

महाराष्ट्र शासन मान्यता / दरनिश्चिती असलेल्या महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्यादित, मुंबई यांचेकडून ३०० चौरस फुटाचे ३६ नग सतरंजी प्रति चौ.फु.र.रू.११=०४ प्रमाणे १८ माध्यमिक विद्यालयांकरीता रेट कॉन्ट्रक्ट नुसार करारनामा न करता थेट खरेदीकामी येणाऱ्या ( ३०० x ३६ x ११.०४ = १,१९,२३२/-) एकूण र.रू.१,१९,२३२/- [र.रू.एक लाख एकोणीस हजार दोनशे बत्तीस] चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक- ११०६७ विषय क्रमांक- १५
दिनांक- ४.०५.२०१० विभाग- दूरसंचार
सुचक- मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक- मा.जगदीश शेट्टी
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.दूरसंचार/१२०/१० दि.२६/४/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे सर्व विभागाच्या तक्रारी स्विकारून निवारण करणेसाठी मनपाची स्वतंत्र हेल्पलाईन करणे आवश्यक असून आलेल्या तक्रारी कंप्युटरवर लोड करणेचे सॉफ्टवेअर प्रोग्रामिंग, डेव्हलोपमेंट करणे तसेच १ लक्ष एसएमएसचा गेटवे मे.टेक ९ सर्विसेस यांचेकडून घेणेसाठी र.रू.७५,०००/- एवढा खर्च अपेक्षीत असून आपात्कालीन महत्वाचे एसएमएस पाठविणेसाठी मे.रिलायन्स वेब वल्ड यांचेकडून हायस्पीड वायरलेस ब्रॉडबॅड डाटाकार्ड सुविधा घेणेसाठी व सदर सुविधेचे वार्षिक भाडे अदा करणेसाठी र.रू.१५,०००/- एवढा खर्च असून सदरच्या दोन्ही रकमा आगावू अदा करणेस तसेच आयडीयाचे कंपनीचे एक सिम घेणे आवश्यक असून त्यासाठी प्लॅन १४५ प्रमाणे र.रू.२,०००/- वार्षिक खर्च होणार असून सदरचे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक- ११०६८ विषय क्रमांक- १६
दिनांक- ४.०५.२०१० विभाग- अग्निशामक
सुचक- मा.जगदीश शेट्टी अनुमोदक- मा.आशा सुर्यवंशी
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.अग्नि/३/कावि/६०/१० दि.२७/४/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

अग्निशामक विभागाची आवश्यकता व तातडी विचारात घेता अग्निशामक वाहनांवरील पोर्टेबल पंपाचे कार्बन सिल-२ नग, मे.ए.एम.असोशिएट्स, पुणे-०२ याचेकडून खरेदी करणेत आलेले असल्याने झालेल्या र.रू.९,९८४/- [र.रू.नऊ हजार नऊशे चौऱ्याऐंशी] च्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक- ११०६९ विषय क्रमांक- १७
दिनांक- ४.०५.२०१० विभाग- भूमि आणि जिंदगी
सुचक- मा.प्रभाकर वाघेरे अनुमोदक- मा.आशा सुर्यवंशी
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.भूजिं/२/कावि/१००/१० दि.२७/४/१०

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून-

से.नं.२४, संत तुकाराम महाराज व्यापारी संकुल मधील रिक्त ५ गाळे २५ वर्षाच्या भाडेपट्टाने (लिज) देणेकामी प्राप्त निविदा मधील सर्वोच्च दराच्या १)एन आय बी आर संस्था ( गाळा क्र : बी - १ ला म - ४ क्षेत्र ३९.५६ चौ.मी. र.रु.१४,५०,०००/- ) २) एन आय बी आर संस्था (गाळा क्र : बी - १ ला म - ६ क्षेत्र ३१.०६ चौ.मी.र.रु.१०,५०,०००/- ) ३) श्रीम.शर्मिला बाबर (गाळा क्र.सी - तळ म - १६ क्षेत्र २१:०० चौ.मी.र.रु.१०,६६,०००/-) ४) श्रीम विजया सोनवणे (गाळा क्र: सी - तळ म - १७ क्षेत्र २१.०० चौ.मी.र.रु. ९,००,०००/- ) ५)श्री.राजेंद्र बाबर(गाळा क्र.डी - तळ - १० क्षेत्र २१:०० चौ.मी.र.रु.१०,६६,०००/- या निविदा धारकांना प्रस्तावित केलेप्रमाणे गाळे २५ वर्षाच्या लिजने निविदा अटी शर्तीनुसार देणेस मा.आयुक्त यांचे प्रस्तावाप्रमाणे मान्यता देणेत यावी से.नं.२४ श्री.संत तुकाराम महाराज व्यापारी संकुल निगडी येथील उपहारगृहासाठी निविदा प्रसिध्द केली होती. उपहारगृह ब्लॉक सी दुसरा मजल्यासाठी सौ.सुप्रिया शेट्टी यांनी निविदा भरली आहे मनपाची २५ वर्षा साठी लिज किंमत र.रू.४,१२,३००/- इतकी आहे सौ.सुप्रिया शेट्टी यांनी सदर गाळ्यासाठी र.रू.४,९०,०००/- देऊ केली आहे ही रक्कम मनपाच्या लिज रकमेपेक्षा जास्त असल्याने से.नं.२४ श्री.संत तुकाराम महाराज व्यापारी संकुल निगडी येथील उपहारगृह ब्लॉक सी दुसरा मजल्यासाठी सौ.सुप्रिया शेट्टी यांना २५ वर्षासाठी लिजने (भाडेपट्टा करार) देण्यास मान्यता देणेत यावी अशी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक- ११०७० विषय क्रमांक- १८
दिनांक- ४.०५.२०१० विभाग- संगणक
सुचक- मा.वर्षा मडीगेरी अनुमोदक- मा.जयश्री गावडे
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.संगणक/८/कावि/१६५/१० दि.२७/४/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

कॉम्प्युटर सोसायटी ऑफ इंडियाचे सभासदत्व नुतनीकरणा साठी र.रू.१०,०००/- [र.रू.दहा हजार] अदा करणेकामी येणारे खर्चास (करारनामा न करता, निविदा न मागविता, थेट पध्दतीने) मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक- ११०७१ विषय क्रमांक- १९
दिनांक- ४.०५.२०१० विभाग- वैद्यकीय
सुचक- मा.एकनाथ थोरात अनुमोदक- मा.तानाजी खाडे
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वैद्य/६/कावि/२८०/१० दि.२६/४/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मौजे पुनावळे, ता.मुळशी, जि.पुणे येथील फॉ.स.२४ मधील क्षेत्र २२.८० हे. वनजमीन पिंपरी चिंचवड शहरातील घनकचरा व्यवस्थापन, प्रक्रिया, भराई या प्रयोजना साठी वन (संवर्धन) अधिनियम १९८० मधील कलम २ अंतर्गत प्रस्तावास तत्वत मान्यतेमधील र.रू.२,६३,५७,७५०/- [र.रू. दोन कोटी त्रेसष्ट लाख सत्तावन्न हजार सातशे पन्नास] खर्चास व सदरचा खर्च नगररचना विभागाकडील भुसंपादन निधी या लेखाशिर्षामधुन खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक- ११०७२ विषय क्रमांक- २०
दिनांक- ४.०५.२०१० विभाग- वैद्यकीय
सुचक- मा.तानाजी खाडे अनुमोदक- मा.एकनाथ थोरात
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वैद्य/१अ/कावि/३६/१० दि.२७/४/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे आकुर्डी रूग्णालय, तालेरा रूग्णालय, भोसरी रूग्णालय व थेरगांव रूग्णालय येथे ज्येष्ठ नागरीकांची (६० व त्यापेक्षा जास्त वय असलेल्या) मोफत तपासणी (ब्लड प्रेशर, डायबेटिस, मोती बिंदू इ.) कार्यक्रम दि.२९/४/२०१० ते १/५/२०१० या कालावधीत सकाळी १०.०० ते १२.३० व बोनडेन्सिटी तपासणी कार्यक्रम दि.१/५/२०१० रोजी सकाळी १०.०० ते १२.३० या वेळेत आयोजित करणेस व सदर तपासणी कोणतेही शुल्क न आकारता (केसपेपर, तपासणी व महापालिकेकडे उपलब्ध असणारी औषधे) करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक- ११०७३ विषय क्रमांक- २१
दिनांक- ४.०५.२०१० विभाग- माध्यमिक शिक्षण
सुचक- मा.राजेंद्र साळुंके अनुमोदक- मा.प्रभाकर वाघेरे
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.माध्य/शि/१/कावि/४३१/१० दि.२६/४/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपा माध्यमिक विद्यालयातील इ.१० वी विद्यार्थीकरीता उन्हाळी मार्गदर्शन वर्ग सन २०१०-२०११ या वर्षात आयोजित करण्यास व प्रत्येकी र.रू.२,०००/- याप्रमाणे प्रत्यक्ष विषय शिकविणाऱ्या शिक्षकांच्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक- ११०७४ विषय क्रमांक- २२
दिनांक- ४.०५.२०१० विभाग- नगरसचिव
सुचक- मा.प्रभाकर वाघेरे अनुमोदक- मा.राजेंद्र साळुंके
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नस/२/कावि/२१४/१० दि.२१/४/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.असोसिएट सेक्रेटरी, अखिल भारतीय महापौर परिषद, नवी दिल्ली यांचेकडील पत्र क्र.४०८१, दिनांक १/४/२०१० व बिल क्र.३३, दि.१ एप्रिल, २०१० नुसार अखिल भारतीय महापौर परिषदेची सन २०१०-११ या वर्षाकरीताची वर्गणी र.रू. १०,०००/- [र.रू.दहा हजार] त्यांस अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक- ११०७५ विषय क्रमांक- २३
दिनांक- ४.०५.२०१० विभाग- विद्युत जशुकें
सुचक- मा.रामदास कुंभार अनुमोदक- मा.सुरदास गायकवाड
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वि/जशुकें/१/१९७/१० दि.२९/४/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपा मध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या ताथवडे गावातील पंपाची दुरुस्ती करणे व संलग्न कामे करणेचे काम मे.एक्सल ईलेक्ट्रिकल, भोसरी यांचेकडून करून घेणेस व अपेक्षित खर्च र.रू.४९,८२८/- [र.रू.एकोणपन्नास हजार आठशे अठ्ठावीस] मे.एक्सल ईलेक्ट्रिकल, भोसरी यांना करारनामा न करता अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

ठराव क्रमांक- ११०७६ विषय क्रमांक- २४
दिनांक- ४.०५.२०१० विभाग- मध्यवर्ती साहित्य भांडार (वैद्य)
सुचक- मा.सुरदास गायकवाड अनुमोदक- मा.रामदास कुंभार
संदर्भ-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मसाभां/४/कावि/१४८/१० दि.२१/४/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

राष्ट्रीय कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेकरिता सांगवी रूग्णालयास श्रीम.कल्पणा कोकाटे यांचे वाहन क्र. एम. एच.१४/पी.५९०६, थेरगांव रूग्णालयास श्री.आलमगिर नाईकवडी यांचे वाहन क्र. एम. एच.१४/पी.६५६९, जिजामाता रूग्णालयास श्रीम.विमलताई साठे यांचे वाहन क्र.एम.एच.१२ /जे.ऐ.३६८१, यमुनानगर रूग्णालयास श्री.सुहास भेगडे यांचे वाहन क्र.एम.एच.१४/जी.४७५६ व आकुर्डी रूग्णालयास श्री.धनाजी जगताप यांचे वाहन क्र. एम.एच.१४/पी.४७५१ या वाहनांस प्रतिदिनी र.रू.६००/- किलोमीटर ८० मर्यादेपर्यंत, महिन्यामध्ये वापरण्यात येणाऱ्या दिवसाचा विचार करता सरासरी ८० किलोमीटरच्या पुढे प्रति किलोमीटर र.रू.४=६० या प्रमाणे घेण्यास व दि.१/४/२०१० ते ३१/३/२०११ पर्यंत मुदतवाढ व येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------------

<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले-</u>

ठराव क्रमांक- ११०७७ विषय क्रमांक- २५
दिनांक- ४.०५.२०१० विभाग- स्थापत्य
सुचक- मा.प्रभाकर वाघेरे अनुमोदक- मा.राजेंद्र साळुंके
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. स्था/नि/१अ/कावि/ /१० दि.४/५/१०

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून-

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.६/२००९-१० मधील अ.क्र.१ अन्वये, अ प्रभाग व मुख्यालयातील रस्त्यांचे हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणे कामी मे.अजवानी इंफ्रास्ट्रक्चर प्रा.लि. (नि.र.रू.४,३०,००,०००/- [र.रू.चार कोटी तीस लाख] पेक्षा २७.३० % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मंजुर दराने र.रू.४,३०,००,०००/- [र.रू.चार कोटी तीस लाख] पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा रक्कमेच्या १५ % पर्यंत निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक- ११०७८ विषय क्रमांक- २६
दिनांक- ४.०५.२०१० विभाग-विद्युत
सुचक- मा.रामदास कुंभार अनुमोदक- मा.आशा सुर्यवंशी
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.सशअ/५५१/१० दि.४/५/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे-

मा.महापौर यांनी दि.२२ एप्रिल, २०१० रोजी आयोजित केलेल्या बैठकीमध्ये झोपडपट्टीतील ग्राहकांसाठी प्रति वर्षी र.रू.१,०७०/- ऐवजी प्रतिवर्षी र.रू.७००/- याप्रमाणे पाणीपट्टी आकारण्याचे जाहीर केलेनुसार सन २०१०-११ या वर्षात झ ोपडपट्टीतील ग्राहकांसाठी (मीटर न बसविलेल्या) प्रति वर्षी र.रू.१,०७०/- ऐवजी प्रतिवर्षी र.रू.७००/- याप्रमाणे पाणीपट्टी आकारण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक- ११०७९ विषय क्रमांक- २७
दिनांक- ४.०५.२०१०
सुचक- मा.प्रभाकर वाघेरे अनुमोदक- मा.आशा सुर्यवंशी
संदर्भ-मा.प्रभाकर वाघेरे, मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव...

मनपा मधील कार्यकारी अभियंता, उपअभियंता, उपमुख्यलेखापरिक्षक व प्र.वैद्यकीय अधिकारी हे वर्ग १ व २ चे अधिकारी, जे कार्यालयीन कामकाजासाठी

स्वतःचे वाहन वापरतात, त्यांचे वाहन भत्त्यामध्ये पेट्रोल/डिझेलचे चालू दराप्रमाणे वाढ होणे गरजेचे असल्याने वरील पदनामाचे अधिकाऱ्यांना पेट्रोल/डिझेलचे वाहन कार्यालयीन कामकाजासाठी वापरल्यास एकाच दराने प्रस्तावात नमुद प्रमाणे चारचाकी वाहन भत्ता (फिरती भत्ता) अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक-११०८० विषय क्रमांक- २८

दिनांक- ४.०५.२०१०

सुचक- मा.प्रभाकर वाघेरे अनुमोदक- मा.आशा सुर्यवंशी

संदर्भ-मा.प्रभाकर वाघेरे, मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव...

खाली नमुद केलेल्या संस्थाकडून त्यांचे नावापुढे नमुद केलेल्या वॉर्डातील दैनंदिन साफसफाई करून घेणेकामी लागणारे आवश्यक ते स्वयंसेवक किमान वेतन दराने उपलब्ध करून घेऊन त्यांचेकडून पुढील २ वर्षे कालावधीत दैनंदिन साफसफाई करून घेण्यास व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

श्री निवास स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादीत - ६९

सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक-११०८१ विषय क्रमांक- २९

दिनांक- ४.०५.२०१०

सुचक- मा.प्रभाकर वाघेरे अनुमोदक- मा.आशा सुर्यवंशी

संदर्भ-मा.प्रभाकर वाघेरे, मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव...

मनपा वाहनचालक कक्षातील टि.व्ही. जुना झाल्याने खराब झाला असल्याने वाहन चालकांचे करमणुकीसाठी LG कंपनीचा २९ इंची L.C.D. टि.व्ही. बसविणेस व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक-११०८२ विषय क्रमांक- ३०

दिनांक- ४.०५.२०१०

सुचक- मा.प्रभाकर वाघेरे अनुमोदक- मा.आशा सुर्यवंशी

संदर्भ-मा.प्रभाकर वाघेरे, मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव...

भोसरी येथील जुना प्र.क्र.५ (नविन प्र.क्र.१५) मधील स.नं.२०० आरक्षण क्र.४०७ येथे महिलांसाठी इनडोअर गेमसाठी हॉल बांधणे व इतर अनुषंगिक कामे करणे या कामाची नि.क्र.२९/७-०६/०७ यानुसार कामाचे ठेकेदार मे.आर.डी.काटे

यांनी कामाअंतर्गत स्थापत्य विषयक रस्ते, गटर्स, कॉंक्रीट पेव्हींग, पेव्हींग ब्लॉक्स इ. कामे केलेली असून वॉर्डात मागणी प्रमाणे जागे अभावी इनडोअर गेम हॉल बांधता येत नसल्याने अत्यावश्यक कामासाठी विषयांकीत कामातून तसेच मनपाचे सन २०१०-११ चे अंदाजपत्रकात केलेल्या तरतूदीतून व निविदा र.रू.४४,०९,३३६/- कामासाठी खर्च झालेली आत्तापर्यंतची रक्कम वजा करता र.रू.२८,२८,९९३/- इतकी वजा झालेली असल्याने राहिलेली र.रू.१५,८०,३४३/- खर्चाची अत्यावश्यक कामे करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक-११०८३ विषय क्रमांक- ३१
दिनांक- ४.०५.२०१०
सुचक- मा.प्रभाकर वाघेरे अनुमोदक- मा.आशा सुर्यवंशी
संदर्भ-मा.प्रभाकर वाघेरे, मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव...

नेपाळ कराटे असोसिएशन च्या वतीने दि.९ ते १५ मे २०१० रोजी आंतरराष्ट्रीय कराटे कॅम्प काठमांडू, नेपाळ येथे आयोजित करण्यात आला असून पिंपरी चिंचवड कराटे असोसिएशनच्या सात कराटे पटूंस आमंत्रित करण्यात आले असल्याने सदरच्या स्पर्धेस उपस्थित रहाणेकामी पिंपरी चिंचवड कराटे असोसिएशनच्या नांवे र.रू.८०,०००/- अनुदान अनुदानाच्या अटी शिथील करून मा.महापालिका सभेच्या उमेदमान्यतेवर देणेस मान्यता देणेत येत आहे. मा.महापालिका सभेकडील मान्यतेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक-११०८४ विषय क्रमांक- ३२
दिनांक- ४.०५.२०१०
सुचक- मा.प्रभाकर वाघेरे अनुमोदक- मा.आशा सुर्यवंशी
संदर्भ-मा.प्रभाकर वाघेरे, मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव...

मनपा सांगवी येथे स्वाध्याय परिवाराच्या सौ.धनश्री श्रीनिवास तळवळकर उर्फ दीदी यांना मनपा मार्फत मानपत्र प्रदान व नागरी सत्कार समारंभ सोहळ्याचे आयोजन करणेत आले आहे सदर सोहळ्यास विद्युत, प्रकाश, ध्वनीक्षेपण, जनरेटर इ..तात्पुरती व्यवस्था करणेकामी येणाऱ्या अंदाजे र.रू. ४,००,०००/- पर्यंतच्या खर्चास तसेच सदरचा खर्च प्रभागात तरतुदीमधून करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक-११०८५ विषय क्रमांक- ३३
दिनांक- ४.०५.२०१०
सुचक- मा.प्रभाकर वाघेरे अनुमोदक- मा.आशा सुर्यवंशी
संदर्भ-मा.प्रभाकर वाघेरे, मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव...

भोसरी जलतरण तलावावरील फिलट्रेशनचे दोन पंप, दोन स्टार्टर व

वाळू बदलणे इ.रिपेंअरींगचे काम मे.श्रीधर एंटरप्रायझेस, चिंचवड यांचेकडून त्यांचे लघुत्तम दरानुसार करून घेणेस व येणाऱ्या र.रू.१,२०,०००/- अथवा प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक-११०८६ विषय क्रमांक- ३४

दिनांक- ४.०५.२०१०

सुचक- मा.रामदास कुंभार अनुमोदक- मा.तानाजी खाडे

संदर्भ:- मा.रामदास कुंभार, मा.तानाजी खाडे यांचा प्रस्ताव...

क प्रभाग व मुख्यालयातील रस्त्याचे हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणे (नि.क्र.६/३-०९/१०, ठेकेदार मे.ठाकूर इन्फ्रा.प्रॉजेक्ट्स प्रा.लि.) हे काम सध्या चालू आहे सदर अंदाजपत्रकात समाविष्ट केलेल्या काही रस्त्यावर ड्रेनेज पाणीपुरवठा, विद्युत विभागामार्फत खोदाईचे काम चालू आहे व काही रस्त्यावर प्रस्तावित आहे त्यामुळे सदर रस्ते डांबरीकरण करणे ऐवजी वॉर्डातील इतर आवश्यक रस्ते पावसाळ्यापुर्वी डांबरीकरण करणेची आवश्यकता असल्याने निविदेतील अट क्र.६० (भाग २, पान क्र.३९) रद्द करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक-११०८७ विषय क्रमांक- ३५

दिनांक- ४.०५.२०१०

सुचक- मा.प्रभाकर वाघेरे अनुमोदक- मा.आशा सुर्यवंशी

संदर्भ-मा.प्रभाकर वाघेरे, मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव...

मनपाचे सेक्टर २३ जलशुध्दीकरण केंद्र येथे सध्या एक दूरध्वनी सुविधा असून कामकाजाचे सोईचे दृष्टीने सदर ठिकाणी कार्यकारी अभियंता यांची केबीन व स्टोअर या ठिकाणी असे अनखीण दोन दूरध्वनी पुरविणेस व वापराची अधिकतम मर्यादा र.रू.५००/- प्रतिमाह निश्चित करून त्यावर येणाऱ्या बिलाची वसूली संबंधीत अधिकारी यांचेकडून करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक-११०८८ विषय क्रमांक- ३६

दिनांक- ४.०५.२०१०

सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक- मा.सुरदास गायकवाड

संदर्भ- मा.जितेंद्र ननावरे, मा.सुरदास गायकवाड यांचा प्रस्ताव...

मनपाच्या सन २०१०-११ चे अंदाजपत्रकात क प्रभाग मुख्यालयामध्ये विशेष योजने अंतर्गत भोसरी एम.आय.डी.सी. मधील आ.क्र.४० प्लॉट क्र.२०१ येथे लघुउद्योजकांच्या पुनर्वसनासाठी इमारत बांधणेचे काम चालू आहे मनपाचे सन २०१०-११ चे अंदाजपत्रकात तरतूद र.रू.२० लाख इतकी केलेली आहे तथापि काम पुर्ण होण्यासाठी वाढीव तरतुदीची आवश्यकता आहे तरी मनपाच्या इतर कामांच्या तरतूदीतून प्रस्तावा सोबत जोडलेल्या (वाढ/घट) तक्त्यानुसार तरतुदीचे वर्गीकरण करण्यात यावे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक-११०८९ विषय क्रमांक- ३७
दिनांक- ४.०५.२०१०
सुचक- मा.प्रभाकर वाघेरे अनुमोदक- मा.आशा सुर्यवंशी
संदर्भ-मा.प्रभाकर वाघेरे, मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव...

मनपाचे सन २०१०-११ अंदाजपत्रकात प्रस्तावात नमुद प्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक-११०९० विषय क्रमांक- ३८
दिनांक- ४.०५.२०१०
सुचक- मा.प्रभाकर वाघेरे अनुमोदक- मा.आशा सुर्यवंशी
संदर्भ-मा.प्रभाकर वाघेरे, मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव...

स्थापत्य अ प्रभागाकडे प व अ अंदाजपत्रकाअंतर्गत प्रस्तावात नमुद प्रमाणे तरतुदी आहेत वरील कामे महत्वाची व आवश्यक असून त्यासाठी वाढीव तरतूदी करणे आवश्यक आहे एकूण वाढीव तरतूद र.रू. ४,४३,००,०००/- इतकी वाढीव जमा रक्कम जकात उत्पन्नात अपेक्षित धरून मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक-११०९१ विषय क्रमांक- ३९
दिनांक- ४.०५.२०१०
सुचक- मा.प्रभाकर वाघेरे अनुमोदक- मा.राजेंद्र साळुंके
संदर्भ- मा.प्रभाकर वाघेरे, मा.राजेंद्र साळुंके यांचा प्रस्ताव...

प्रस्तावात नमुद केलेल्या कामासाठी मनपाच्या सन २०१०-११ या आर्थिक वर्षामध्ये तरतुद उपलब्ध नसल्याने प्रस्तावात नमुद प्रमाणे तरतूद वर्गीकरणास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक-११०९२ विषय क्रमांक- ४०
दिनांक- ४.०५.२०१०
सुचक- मा.प्रभाकर वाघेरे अनुमोदक- मा.आशा सुर्यवंशी
संदर्भ-मा.प्रभाकर वाघेरे, मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव...

अमर दिप मित्र मंडळ यांचेकडून थेरगांव (वॉर्ड क्र.८२ थेरगांव गावठाण) येथील स.नं.९ बापुजीबुवा उद्यान पुढील ५५ वर्षे कालावधीकरिता देखभाल संरक्षण कामी नवीन किमान वेतन दराने स्वयंसेवक उपलब्ध करून घेऊन देणेस व याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक-११०९३ विषय क्रमांक- ४१
दिनांक- ४.०५.२०१०
सुचक- मा.जितेंद्र ननावरे अनुमोदक- मा.रामदास कुंभार
संदर्भ-मा.जितेंद्र ननावरे, मा.रामदास कुंभार यांचा प्रस्ताव...

सन २०१०-११ चे अंदाजपत्रका तील पुस्तक क्र.३ मधील पान क्र.२६२ ब)भाजी मार्केट प्रभाग अ.क्र.१ प्रभाग क्र.९२ सांगवी येथील भाजी मंडई इमारतीची स्थापत्य विषयक दुरुस्तीची कामे करणे याकामावर तरतूद केलेली नसल्याने सदर कामाचे दुरुस्तीसाठी र.रू.१,००,०००/- तरतूद करणेसाठी अंदाजपत्रक पुस्तक क्र.२ संगणक विभाग पान क्र.१०० व १०१ वरील अ.क्र.४ संगणक दुरुस्ती व देखभाल या लेखाशिर्षावरील तरतूद र.रू.३० लाख मधून र.रू.१,००,०००/- वर्ग करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(प्रशांत कृष्णराव शितोळे)
सभापती
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक- नस/०९/कावि/ ५९५/२०१०
दिनांक- ६/०५/२०१० चे लगत

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत- सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.